एस.सी.सी. ४८४/२०२३
सरकार वि. भरत व इतर.
**निशाणी २५ सोबत**

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र. १ याची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

| | |
|---|---|
| माझे नाव – दिपक रामहरी भोर, | वय – २५ वर्षे, |
| व्यवसाय – शिक्षण, | राहणार – अंबड, |
| तालुका – अकोले, | जिल्हा – अहमदनगर. |

**सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –**

१. सन २०२२ मध्ये मी अगस्ती महाविद्यालय, अकोले येथे बी.कॉम तृतीय वर्षात शिक्षण घेत होतो. अपेक्षा ही माझी क्लासमेट होती. आमच्या दोघांची मैत्री झाली होती. त्यानंतर आम्ही दोघांनी लग्न करण्याचे ठरवले. दिनांक २८.१२.२०२२ रोजी आळंदी येथे आम्ही रजिस्टर पध्दतीने लग्न केले. लग्न करून आम्ही घरी आलो. आमचे पेपर चालू असल्यामुळे घरी सांगायचे नाही असे ठरवले होते. पेपर झाल्यावर आम्ही घरी सांगणार होतो.

२. जुन २०२३ मध्ये आमचे पेपर संपले. अपेक्षा हीने तिच्या आईवडीलांना आमचे लग्न झाल्याबाबत सांगितले. त्यानंतर तिला तिच्या मामाने गावाला नेले. मामाने मला फोन करून सांगितले की, आम्ही तिला पाठवणार नाही. दिनांक १७ जुन २०२३ रोजी पेपर संपल्यानंतर अपेक्षा हीने मला पिंपळगाव निपाणी येथे बोलावले व सांगितले की, तु ये, मी तुझी साथ देईल. मी तेथे गेल्यानंतर तिने माझी साथ दिली नाही, माझ्या बाजुने बोलली नाही. तेथे तिचे मामा भरत विठ्ठल रेवगडे, काका सुमीत जाधव, गणोरे येथील दुसरे मामा प्रदीप भालेराव, अपेक्षाची आईवडील व भाऊ यांनी

मला शिवीगाळ केली. तसेच ते म्हणाले की, आम्ही अपेक्षाला पाठवणार नाही, आम्ही तुला मारहाण करू अशी धमकी दिली. त्यानंतर मी घरी आलो. मला अपेक्षाने साथ न दिल्यामुळे मी घरातील औषधाची बाटली हातात घेतली व पिली. त्यानंतर मला त्रास झाल्याने भांडकोळी हॉस्पिटल येथे ॲडमीट झालो. तेथे उपचार चालू असताना पोलीसांनी माझा जबाब नोंदवला. आता मला अभिलेखावरील माझा जबाब दाखवण्यात आला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी २८** देण्यात येते.

३. सदर जबाब नोंदवल्यानंतर पोलीसांनी माझा पुरवणी जबाब नोंदवला होता. मी आरोपींना ओळखतो. आजरोजी विठ्ठल रेवगडे, सुमन विलास तोरमल, विलास तोरमल, सुशील तोरमल हजर आहेत. इतर आरोपी मला दाखवल्यास मी ओळखू शकतो.

*(साक्षीदार अभियोगपक्षास पुर्णत: सहकार्य करत नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास भारतीय साक्षीपुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)*

**उलटतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –**

४. हे म्हणणे खरे आहे की, मी दिनांक १७.०६.२०२३ रोजी पिंपळगाव निपाणी येथे संध्याकाळी ०७:३० वाजता गेलो त्यावेळी आरोपी भरत रेवगडे व प्रदिप भालेराव यांनी मला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. हे

म्हणणे खरे आहे की, त्यावेळी माझे चुलते संपत, आत्या सुनिता हे मला सोडवण्याकरीता आले असता त्यांना व मला सुमीत जाधव, अपेक्षाचे वडील, आई सुमन व भाऊ सुशील यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. हे म्हणणे खरे आहे की, त्यांनी, पुन्हा अपेक्षाला नेण्यासाठी आले तर तुम्हाला जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली.

**उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. के. बी. हांडे यांच्या मार्फत**

५. हे म्हणणे खरे आहे की, मी व अपेक्षा हीने नोंदणी कार्यालयात जावून लग्न केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर विवाहाची नोंद नोंदणी कार्यालयात अथवा ग्रामपंचायत कार्यालयात झालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, घरच्यांनी मान्यता दिल्यानंतर विधिवत लग्न करू असे ठरवले होते. हे म्हणणे खरे आहे की, अपेक्षा हीने घरच्यांच्या दबावामुळे लग्नाला नकार दिला असा मला संशय आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे मला राग आला व भावनेच्या भरातून मी सदरची फिर्याद दिली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी मला मारहाण केली, शिवीगाळ केली, धमकी दिली असा कोणताही प्रकार घडला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीस स्टेशनला भावनेच्या भरात, रागाच्या भरात जो जबाब दिला व जो पोलीसांनी लिहून घेतला त्याप्रमाणे मी आजरोजी जबाब देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्यामध्ये सामंजस्य होवून तडजोड झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकारामुळे मी औषध घेतले हे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी मला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपेक्षा हीने लग्नास नकार दिला त्यामुळे मी आजरोजी त्यांच्याविरूध्द खोटी साक्ष देत आहे. माझी आरोपींविरूध्द आता कोणतीही

तक्रार राहिली नाही.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2025.12.17 17:28:39 +0530

दिनांक १७.१२.२०२५
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कोर्ट नं. २, अकोले .